**सेवेत असताना दिवंगत झालेल्या विजाभज आश्रमशाळा/निवासीशाळा/विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग**
**शासन निर्णय, क्र.विभशा-२०१८/प्र.क्र.७०/विजाभज-२**
पहिला मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २२ मार्च, २०१८

**वाचा:-** १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विभशा-२००७/ प्र.क्र.२४/ मावक-६/ दि.२३.१०.२००७

**प्रस्तावना:-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विभशा-२००७/प्र.क्र.२४/मावक-६, दि.२३.१०.२००७ अन्वये सेवेत असताना दिवंगत झालेल्या विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळा/ निवासीशाळा/विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. ज्या आश्रमशाळेतील कर्मचारी मृत्यु पावला आहे, अशा कर्मचाऱ्यांचे जवळच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याची तरतूद सविस्तरपणे या शासन निर्णयामध्ये नमूद केलेली आहे. परंतू सदरहू शासन निर्णयातील तरतूदीचे काटेकोरपणे पालन केले जात नसल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे. यास्तव, सेवेत असताना दिवंगत झालेल्या विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळा/ निवासीशाळा/विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत विहित कार्यपद्धती निश्चीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सेवेत असताना दिवंगत झालेल्या विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळा/ निवासीशाळा/विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबतची तरतुद शासन निर्णय दि.२३.१०.२००७ परिशिष्ट-अ मध्ये सविस्तर नमूद करण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. संदर्भीय शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ मधील नियम ५(अ) नुसार अनुकंपा कारणास्तव शिक्षक व शिक्षकेत्तर पदावर नेमणूकीसाठीचा अर्ज सर्व कागदपत्रांसह संबंधित कर्मचारी दिवंगत झालेल्या दिवसांपासून १ वर्षाच्या आत करणे आवश्यक आहे. परिपूर्ण अर्ज संबंधित संस्थेकडे सादर करून त्याची एक प्रत पोचपावतीसह त्याच दिवशी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे देणे अनिवार्य राहील. याबाबतचा अर्ज फक्त संस्थेकडे केला असेल तर संस्थेने सदरहू अर्ज संबंधित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडे सुपूर्त करावा व त्याची एक प्रत

संबंधित सहायक आयुक्त समाज कल्याण यांचेकडे १५ दिवसांत सादर करावी तसेच मुख्याध्यापक यांनी १५ दिवसांच्या आत तो अर्ज संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे पाठविणे अनिवार्य राहील, अन्यथा फक्त संस्थेकडे किंवा मुख्याध्यापकांकडे केलेला अर्ज ग्राहय धरता येणार नाही. कोणत्याही परिस्थितीत संस्थेने या विभागाची मान्यता मिळाल्याशिवाय परस्पर नियुक्ती देवू नये. परस्पर नियुक्ती दिल्यास त्यास या विभागाकडून मान्यता मिळणार नाही आणि अशा संस्थेविरुध्द मान्यता रद्द करण्याची कार्यवाही केली जाईल.

२. संदर्भीय शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ मधील नियम ६(अ) नुसार संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या कार्यालयात अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी येणाऱ्या त्या जिल्हयातील पात्र उमेदवारांच्या अर्जांची ज्येष्ठता यादी सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी ठेवावी. असे करताना गट-क मधील व गट-ड मधील पदांसाठी स्वतंत्र यादी ठेवावी. जे उमेदवार शासन निर्णयानुसार पात्र ठरणार नाहीत, त्यांना तात्काळ त्याबाबत लेखी कळवून प्रकरण बंद करावे. अपात्र उमेदवारांना ज्येष्ठतायादीत ठेवू नये. अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदारास खालील कारणांमुळे अपात्र ठरविण्यात यावे :-

१. दिवंगत कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या १ वर्षाच्या आंत अर्ज न केल्यास किंवा १ वर्षाच्या आंत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न केल्यास.

२. अर्ज केलेल्या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण करत नसल्यास.

३. वारसाच्या निकषात बसत नसल्यास किंवा वारसाबाबत वाद असल्यास .

४. वयाबाबतच्या अटीची पूर्तता करत नसल्यास.

५. शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही अटी / शर्तींची पूर्तता करत नसल्यास

(काही प्रस्तांबाबत संभ्रम निर्माण झाल्यास असे प्रस्ताव शासनाकडे मार्गदर्शनासाठी पाठवावेत)

३. सध्या अनुकंपा तत्वावर नियुक्तींबाबत जे अर्ज बरेच वर्षांपासून प्रलंबित आहेत, त्यात बरीच गुंतागुंत आहे. तसेच आता येणाऱ्या सर्व नवीन प्रस्तावांची तपासणी योग्यरितीने होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व प्रस्ताव शासन निर्णयातील तरतुदींमध्ये बसतात किंवा नाही याची शाहनिशा करून जे प्रस्ताव नियमाप्रमाणे अनुकंपा नियुक्तीस पात्र आहेत फक्त तेच प्रस्ताव शिफारसींसह या विभागाकडे मान्यतेसाठी पाठवावेत. अपात्र प्रस्तावांना आपल्याच स्तरावरून संबंधितांना लेखी कळवून प्रकरण बंद करावे. तसेच शिफारशी करताना शासनाचे अनुकंपा नियुक्तीबाबतचे जे धोरण आहे, उदा: रिक्त पदांची उपलब्धता, पदांसाठी उमेदवारीची योग्यता, वय, वारसाप्रमाणे पात्र उमेदवार आहेत किंवा नाही, अर्ज वेळेवर (दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आंत केला आहे किंवा नाही) व इतर सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव या विभागाकडे मान्यतेसाठी पाठवावा. अनुकंपा नियुक्तीचे प्रस्ताव यापुढे संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे कार्यालयामार्फत न पाठवता थेट या विभागाकडे पाठवावेत जेणेकरुन वेळेची बचत होईल.

४.	संदर्भाधिन शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ मधील नियम ६(ब) नुसार संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण, समाज कल्याण निरिक्षक यांनी प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करुन जेष्ठतेनुसार पात्र असलेल्या अर्जदारास, त्याच्या अर्हतेनुसार संबंधीत आश्रमशाळेत उपलब्ध असलेल्या रिक्त पदावर त्याच आश्रमशाळेत वा त्याच संस्थेच्या इतर आश्रमशाळेत प्रथमत: सदरहू अर्जदाराचा नियुक्तीसाठी विचार करावा. मात्र, त्याच आश्रमशाळेत वा त्याच संस्थेच्या इतर आश्रमशाळेत त्यासाठी पद उपलब्ध नसल्यास त्याच जिल्हयातील इतर संस्थेच्या आश्रमशाळेत सेवाप्रवेश नियमानुसार व इतर तरतूदीनुसार नियुक्तीसाठी संबंधित अर्जदाराचा विचार करण्यात यावा. संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी अनुकंपा तत्वावर नियुक्ती संदर्भात प्राप्त झालेले परिपूर्ण प्रस्ताव ज्येष्ठता यादीसह तसेच रिक्त पदांच्या माहितीसह या विभागाकडे पाठवावे. त्यास या विभागाची मान्यता मिळाल्यावर सात दिवसाचे आत संबंधित अर्जदाराची नियुक्ती करण्याची जबाबदारी ही संबंधीत संस्थेची राहिल. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधित संस्थेने सहायक आयुक्त, समाज कल्याण यांना विनाविलंब कळविण्यात यावे.

५.	संदर्भाधीन शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ मधील नियम ६(क) नुसार सर्व विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र उमेदरांकडुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या, प्रतिक्षा यादीवर असलेल्या पात्र उमेदवारांची संख्या, प्रत्यक्षात नियुक्ती दिलेल्या पात्र उमेदवारांची संख्या याबाबतची प्रतिवर्षाी ३१ डिसेंबर अखेरची माहिती सहायक आयुक्त,समाजकल्याण यांनी शासनास दरवर्षी ३१ जानेवारी पर्यंत पाठवावी.

६.	संदर्भाधीन शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ मधील नियम ६(ड) नुसार जे आश्रमशाळा प्रमुख त्यांच्या शाळेतील उपलब्ध असलेल्या पदांची माहिती, याबाबत विचारणा करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास देणार नाहीत, अशा आश्रमशाळा प्रमुखाविरुध्द शासन नियमानुसार कारवाई करावी.

७.	उपरोक्त कार्यपद्धतीचे अनुकरण करुन संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी त्यांचे कार्यालयात संदर्भाधीन शासन निर्णयातील नियम ५(क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नोंदवही ठेवून ती वेळोवेळी अद्यावत करावी. सदर नोंदवहीमधील पात्र उमेदवारांचे जेष्ठतेनुसार उपलब्ध रिक्त पदांचा विचार करुन नियुक्तीसाठी शिफारस करावी. संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी त्यांच्या कार्यालयात अनुकंपा नियुक्त्यासंबंधी फक्त पात्र उमेदवारांची सोबतच्या परीशिष्टाप्रमाणे नोंदवही ठेवावी.अपात्र उमेदवारांना लेखी पत्राद्वारे त्यांचा अर्ज अमान्य केल्याबाबत कळवावे. तसेच त्यांचे नाव ज्येष्ठता यादीच्या नोंदवहीमध्ये ठेवू नये.

८.	या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या १ ते ११ रकान्यातील वार्षिक अहवालाची माहिती सहाय्यक आयुक्तांनी शासनास सादर करावी. तसेच सदरची माहिती सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी दर त्रैमासिक कालावधीमध्ये संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचेकडे सादर करावी. प्रादेशिक उपायुक्तांनी याबाबीचा आढावा दर तीन

महिन्यांनी घ्यावा. अनुकंपा या संवर्गातील संबंधीत जिल्हयाच्या/विभागाच्या प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्याची नोंद त्यांच्या कार्यालयातील नोंदवहीमध्ये घ्यावी. अनुकंपाधारक पात्र कर्मचारी उपलब्ध असल्याचे अथवा नसल्याचे प्रमाणपत्र कर्मचारी मान्यतेच्या / सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करण्याबाबतच्या प्रस्तावासोबत पाठवावे. नोंदवहीमध्ये पात्र अनुकंपा नियुक्तीधारक उपलब्ध असतांना जर इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता दिल्याचे आढळल्यास संबंधीत अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०३२२१५३१५५२१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.03.23 16:31:59 +05'30'

(भा. र. गावित)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
५) सचिव,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई
६) संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव,मंत्रालय, मुंबई
१०) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
११) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) महालेखाकार (वित्त व लेखा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१४) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१५) सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) सर्व संस्थाप्रमुख, मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्चमाध्यमिक आश्रमशाळा यांच्यामार्फत...
१७) मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्चमाध्यमिक आश्रमशाळा
१८) निवड नस्ती (विजाभज-२)

शासन निर्णय क्रमांक - विभशा-२०१८/प्र.क.७०/विजाभज-२, दि.२२ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट- १

| अ. क्र | संस्थेचे नांव | आश्रमशाळेचे नांव व पत्ता | मयत कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम.तसेच त्यांचे सेवार्थ प्रणाली व वेतन देयकाची प्रत | मृत्यु दिनांक, व मृत्यु प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक | वारसदार किंवा नातेवाईकांचे नाव व नाते,तसेच नियमानुसार ते वारसाद्वारे अनुकंपा साठी पात्र आहेत काय. | अर्जदाराचे अर्जाच्या दिनांकास वय तसेच वयोमर्यादेत बसत आहेत काय. | संस्था/ मुख्याध्यापक/ सहायक आयुक्त यांना दिलेल्या अर्जाचा दिनांक व अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | आश्रमशाळेतील मान्य पदापैकी कोणत्या पदासाठी पात्र आहेत व त्या पदाची शेक्षणिक अर्हता अर्जदार धारण करत आहेत काय | नियुक्ती साठी शिफारस करण्यात आलेले पदनाम व संस्था आणि आश्रमशाळेचे नांव | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |